## "यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?"

# बाळशास्त्री जांभेकर

एखाद्या व्यक्तिमत्त्वाची खरी उंची आपणाला क्वचितच् कळते. एकतर त्या उंचीवर आपण पोहोचलेले असावे लागते; नाहीतर, निदान उत्तम सद्गुणी व्यक्तींच्याविषयी निदान स्वच्छ मनाला कल्पना तरी यावी लागते. आपले मनच कलुषित आणि मूळच्याच कुढेपणामुळे अधिक ठेंगू झालेले असेल तर आपल्याच समाजात उत्तम, सर्व काळासाठी आदर्श ठरणारी, स्वयंभू गुणवंतांची माणसे जन्माला येऊनही; अशा व्यक्तींचे पूर्णांशाने राहो, पण अल्पांशानेही आकलन करून घेण्याची आपली पात्रताच आपण गमावून बसतो.

दुसऱ्या व्यक्तीचे सद्गुण जाणून ते चार लोकात सतत सांगत रहावे लागते. तरच उत्तम सांस्कृतिक परंपरा आणि दर्जेदार जाणिवा समाजात निर्माण होतात. फुलांचा उत्तम सुगंध दाही दिशांना पसरविणाऱ्या सदैव गतिशील असलेल्या, कोणाकडून कसलीच अपेक्षा नसलेल्या वाऱ्याचे गुण आपणाला अंगी बाणवायला हवेत. तरच ... बाळशास्त्री जांभेकर, मोरोपंत पराडकर, वि. स. खांडेकर, सदानंद बाक्रे, गोविंदवल्लभपंत पराडकर, दुर्गा भागवत, वा. वि. मिराशी, राणी लक्ष्मीबाई, भास्करबुवा बखले, गोविंदराव टेंबे, अण्णासाहेब किर्लोस्कर, बाळ शं. खेर, जयंतराव नारळीकर, गणेश वासुदेव मावळंकर, डॉ. एन्. एम्. हर्डीकर, डॉ. भगवंत रा. कळके, पं. श्री. दा. सातवळेकर, भा. रा. तांबे, सुरेश भट, शं. ना. नवरे .... अशासारख्या शेकडो सद्गुणी व्यक्ती आपणाला नीट कळतील. माध्यमांचा वापर करून, गुणी व्यक्तींनाही खाली कसे खेचले जाते; ते अनेक कऱ्हाड्यांनी अनुभवले. अशासारखीच एक श्रेष्ठ व्यक्ती म्हणजे बाळशास्त्री जांभेकर !! आयुष्य फक्त चौतीस वर्षे !!

त्यांचा जन्म २०.२.१८१२ आणि मृत्यू १७.५.१८४६. उत्तम सांस्कृतिक जाणिवांचा, आधुनिक काळातला 'पहिला उद्गाता' ही त्यांची यथार्थ ओळख होईल ! त्यांचे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, बौद्धिक क्षेत्रातले कार्य महत्त्वाचे ! ज्या कार्याविषयी त्यांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि स्वतःचा सहभाग एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीच्या काळात एकमेव होता, अहंगंडांच्या कृष्ण छायेखाली नसलेल्या त्या काळात, महादेव गोविंद रानडे यासारख्यांनी तसेच या काळातल्या डॉ. य. दि. फडके यांच्यासारख्या विचारवंतांनी ज्यांच्या कार्याची मुक्तकंठाने स्तुती केली - त्यांना "नवविचारांचे जनक, यांच्यापासून नव-विचार सुरू होतात" असे म्हटले, ज्यांनी भारताचे पितामह दादाभाई नवरोजी, तसेच केरुनाना छत्रे, भाऊ दाजी, मंडलिक, काशिनाथ शास्त्री तेलंग, फेरोजशहा मेहता .... गुरुस्थानी मानीत असत अशी एकमेव व्यक्ती म्हणजे बाळशास्त्री जांभेकर !

'दर्पण' हे मराठीतले पहिले वृत्तपत्र दि.६.१.१८३२ या दिवशी बाळशास्त्री जांभेकरांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले; असे किती क्षेत्रात ते पहिले होते ? जाणून घेऊया.

१. 'स्वदेशी', 'स्वभाषा' याचा गंभीर विचार करणारे ते पहिले साक्षेपी विद्वान होते. राजकारणी नव्हते.
२. त्यावेळच्या मुंबई राज्याचे ते पहिले शैक्षणिक अधिकारी होते.
३. वयाच्या १९व्या वर्षी सेक्रेटरी या हुद्द्याचे ते पहिले एतद्देशीय अधिकारी होते.
४. प्रोफेसर श्रेणी मिळवलेले ते पहिले-वहिले एतद्देशीय अधिकारी होते.